**पाहिजेत**

दैनिक अट्टल संकेतसाठी संपूर्ण महाराष्ट्रात वार्ताहर, प्रतिनिधी नेमणे आहेत. संपर्क - ९६२३४८४४८४

दैनिक

# अट्टल संकेत

ATTAL SANKET

Email : attalsanket2023@gmail.com

RNI No. MAHMAR/2023/87816

■ दैनिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ वर्ष-२ ■ अंक-२६६ ■ शनिवार, दि. २८ डिसेंबर २०२४ ■ पाने ४ ■ किंमत २ रूपये

■ Daily ■ Chhatrapati sambhajinagar ■ Vol.2 ■ Issue -266 ■ Saturday, 28 Dec 2024 ■ Pages-4 ■ Price- 2/-

## धस यांच्या रडारवर पुन्हा 'आका'; एकाच व्यक्तीच्या खात्यातून १०० कोटींचा व्यवहार!

### दोन पोलीस अधिकारीही गुंतल्याचा आरोप

**बीड (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येनंतर मंत्री धनंजय मुंडे यांना सातत्याने लक्ष्य करणारे भाजपा आमदार सुरेश धस यांनी आज बीडचे जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कांवत यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी विविध मुद्द्यांवर पोलीस अधीक्षकांकडे आपली चिंता व्यक्त केली. महादेव बेटिंग अॅपच्या माध्यमातून जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर आर्थिक व्यवहार झाल्याचा गंभीर आरोप धस यांनी केला आणि त्याच्या चौकशीची मागणी केली.

धस यांनी सांगितले की, माझ्या मतदारसंघातील टेंभुर्णी गावात एका व्यक्तीच्या खात्यातून ९ अब्ज रुपयांचा व्यवहार झाला आहे. १०० कोटी रुपयांपेक्षा अधिकचे व्यवहार असल्यास ईडीकडून चौकशी होण्याची पद्धत आहे. इथे ९०० कोटी रुपयांचे प्रकरण आहे, त्यामुळे याबर ईडीची चौकशी होणं अत्यंत आवश्यक आहे. तसेच, या प्रकरणात दोन पोलीस अधिकाऱ्यांची नावं धस यांनी पोलीस अधीक्षकांना दिली आणि सांगितले की, चांगलं काम करणारे अधिकारी बाजूला सारले गेले आहेत.



या प्रकरणाचे धागेदोरे मलेशियापर्यंत पोहोचल्याचेही त्यांनी नमूद केले. महादेव बेटिंग अॅप प्रकरणातसुद्धा आकाचा हात असावा, असा संशय आमदार धस यांनी व्यक्त केला.

धस यांनी पुढे दावा केला की, बीडमध्ये गँग ऑफ्ह वासेपूर सारख्या घटनांचा उगम झाला आहे. ङ्कबीडजवळ अनेक जमिनींच्या खरेदीची माहिती समोर येत आहे. परळी बाजार समितीच्या गाळ्यांचं उद्घाटन तीन वर्षांपासून लांबले आहे, कारण ते गायरान जमिनीवर उभारले आहेत. आकाच्या कार्यकर्त्यांनी १४०० एकर गायरान जमीन बळकावली आहे आणि त्यावर ६०० वीटभट्ट्या उभारण्यात आल्या आहेत, त्यातील ३०० अनधिकृत आहेत,ङ्घ असे धस यांनी म्हटले. आकांचे असे उद्योग आता हळूहळू पुढे येऊ लागले आहेत,' अशा शब्दांत धस यांनी आकांची कुंडलीच मांडली. याशिवाय, धस यांनी मंत्री धनंजय मुंडे यांना प्रत्युत्तर देताना म्हणाले, धनुभाऊ, तुमचं विमान खाली आणा. तुम्हाला पालकमंत्री व्हायचं आहे. आमचं लेकरु गेलं आहे, त्याला न्याय द्यायचा आहे. तुम्हाला घेरण्याचा प्रयत्न होतोय, ही काही राजकीय बाब नाही. या मोर्चात वंजारी समाजाचे लोक आणि मुस्लिम लोक देखिल सहभागी होणार आहेत, असे ते म्हणाले.

बीड जिल्ह्यात 'आकां'ची १०० ते १५० एकर जमीन आहे. त्यांनी आपल्या जमिनीत ३० ते ४० कोटी रुपयांचे बंधारे बांधून घेतले आहेत. 'आकां'कडे पाच वर्षात एवढा पैसा आला कुठून? असा सवालही धस यांनी केला आहे.

## ऐनवेळी ५ लाख रोख व ७ तोळे सोने हुंडा मागितला अन् ठरलेले लग्न मोडले !

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

मुलीची पसंती, साखरपुडा, लग्नाची तारीख ठरवून नवरा मुलाचे कपडे घेण्यापर्यंत ९ लाख खर्च झाला अनब ऐनवेळी ५ लाख रोख व ७ तोळे सोने हुंडा मागितला अनब ठरलेले लग्न मोडल्याची फिर्याद सातारो पोलिस स्टेशनमध्ये दाखल झाली आहे. याप्रकरणी मुलासह त्याच्या नातेवाईकावर गुन्हा दाखल झाला आहे.

दिनांक १० जुन २०२४ ते दिनांक ०८/१०/२०२४ दरम्यान, छत्रपती संभाजीनगर येथे फिर्यादी यांच्या मुलीस नवरी म्हणून पसंत करून साखरपुडा करून घेतला. तसेच लग्नाची तारीख ११/०८/२०२४ रोजी सायंकाळ ठरवले. त्यासाठी फिर्यादीने सर्व तयारी केलेली असताना अचानक ५,०००,०० (पाच लाख रुपये) रोख व सात तोळे सोने हुंडयाची मागणी केली. त्यास फिर्यादीने नकार दिला असता त्यांनी ठरलेले लग्न मोडून, फिर्यादीच्या मुलीची पसंती पासून ते लग्नाची तारीख ठरवून नवरा मुलाचे कपडे घेण्यापर्यंत फिर्यादीचा व फिर्यादीच्या कुटुंबीयांचा विश्वास संपादन केला. फिर्यादीने साखरपुडाचे ७,१८,५९० रुपये व लग्नाच्या तयारीसाठी खर्च केलेले एकूण १,८७,०००/- रुपये अशी फिर्यादीचे ९,०५,५९०/- (नऊ लाख पाच हजार पाचशे नव्वद) रुपयाची फसवणुक केली व फिर्यादीच्या मुलीचे लग्न जमलेले असतांना ते मोडल्याने फिर्यादीची बदनामी झालेली असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. याप्रकरणी फिर्यादीच्या तक्रारीवरून आरोपी- १) मुलगा आकाश महेद्र हजारे वय-२९ वर्ष, २) आई ३) बहीन ४) मुलाची मावशी ५) मोठी मावशी, ६) मामा उदय तुपारे, वय-४० वर्षे, ७) मुलाचे आजी (आईची आई) रा. पंचशील नगर, बीड यांच्यावर सातारा पोलिस स्टेशनम ध्ये सातारा गुरन ५९१/२०२४ कलम ३१८(२), ३१८(४), ३१६ (२), ३५६(२), ३(५) BNS. हुंडाबंदी प्रतिबंधक कायदा कलम ३(१) नुसार गुन्हा दाखल झाला असून पुढील तपास सपोनि देशमुख करत आहे.

## पंजाबमध्ये प्रवासी बसचा भीषण अपघात, ८ ठार, अनेक जण जखमी

**चंदीगड :** पंजाबमधील भटिंडा येथे आज सकाळी एका प्रवासी बसचा भीषण अपघात झाला आहे. या भीषण अपघातात ८ जणांचा मृत्यू झाला. तर अनेक जण जखमी झाले आहेत.एका खासगी कंपनीची बस नियंत्रण सुटून पुलावरुन थेट नाल्यात कोसळल्याने हा अपघात झाल्याचे सांगण्यात येत आहे.अपघातात जखमी झालेल्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मृतदेह ताब्यात घेतले आणि शवविच्छेदनासाठी पाठवले. मिळालेल्या माहितीनुसार, भटिंडा येथील कोटशमीर रोड येथे एक बस पुलावरून जात असताना नाल्यात कोसळली. या अपघातात ८ जणांचा मृत्यू झाला. तर अनेक प्रवासी जखमी झाले. स्थानिक प्रशासन आणि बचाव पथकांनी घटनास्थळी धाव घेत जखमींना रुग्णालयात पाठवले.बसमध्ये अडकलेल्या लोकांना बाहेर काढण्यासाठी मोठ्या प्रमाणात रेस्क्यू ऑपरेशन सुरु आहे. अपघाताच्या वेळी पाऊस सुरु असावा, त्याचवेळी बसचा वेग जास्त होता, त्यामुळे हा अपघात झाला असण्याची शक्यता आहे. नेमका अपघात कसा झाला, हे अजून समजू शकलेलं नाही. बसमधील सर्व प्रवाशांना बाहेर काढण्यात आलं आहे. २४ प्रवाशांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती आहे. या दुर्घटनेच्या कारणांचा शोध घेतला जात आहे.

## शेतकऱ्यांच्या अडचणीत वाढ! रासायनिक खतांच्या किमतीत भर

पुणे : आधीच महागाईने त्रस्त झालेल्या शेतकऱ्यांना नव्या वर्षात वाढणाऱ्या खतांच्या किमतीला सामोरे जावे लागणार आहे. हवामान बदलामुळे शेतकऱ्यांना अगोदरच आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, त्यातच आता वाढणाऱ्या रासायनिक खतांमुळे शेतकऱ्यांच्या अडचणीत भर पडणार आहे. खरीप हंगामात झालेले नुकसान कसे भरून काढावे, हा प्रश्न शेतकऱ्यांना सतावत असतानाच अचानक रासायनिक खतांचे भाव वाढल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाले आहेत. रासायनिक खतांच्या किमती आधीच जास्त असताना खत उत्पादक कंपन्यांनी १ जानेवारी २०२५ पासून दरवाढ जाहीर केली आहे. त्यानुसार रासायनिक खतांच्या किमतीमध्ये २०० ते ३०० रुपयांची वाढ होणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना अतिरिक्त भार सहन करावा लागणार आहे.

## 'सीसीएमपी' उत्तीर्ण होमिओपॅथी व्यावसायिकांस अॅलोपॅथी व्यवसाय करण्यास परवानगी

**मुंबई –** नोंदणीकृत होमिओपॅथी वैद्यक व्यावसायिकांनी आधुनिक वैद्यकशास्त्र प्रमाणपत्र (सीसीएमपी) अभ्यासक्रम पूर्ण केल्यास, त्यांना आधुनिक वैद्यकशास्त्र वैद्यक (विषमचिकित्सा) पद्धतीने व्यवसाय करण्यास परवानगी देण्यात येत असल्याची माहिती अन्न व औषध प्रशासनचे आयुक्त राजेश नार्वेकर यांनी दिली आहे. संबंधित व्यावसायिक हे महाराष्ट्र समचिकित्सा वैद्यक व्यवसाय अधिनियम अन्वये नोंदणीकृत असणे व शासनमान्य सर्टिफिकेट कोर्स इन मॉडर्न फार्माकॉलॉजी (सीसीएसपी) उत्तीर्ण केला असणे आवश्यक आहे. किरकोळ व घाऊक औषध विक्रेते हे सर्टिफिकेट कोर्स इन मॉडर्न फार्माकॉलॉजी (सीसीएमपी) पूर्ण करणाऱ्या होमियोपॅथी

## सत्ता कधीच माझ्या डोक्यात जाणार नाही; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी दिली ग्वाही

**नागपूर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

मी पहिल्यांदा राज्याचा मुख्यमंत्री झालो तेव्हा अनेकांच्या मनात शंका होत्या. हा मंत्रीही नव्हता, नवखा आहे, मग कारभार कसा करणार. पश्चिम महाराष्ट्रातील लोकांना वाटायचे, सातत्याने विदर्भावरील अन्यायावर बोलणारा व्यक्ती मुख्यमंत्रिपदी बसला की आपल्यावर अन्याय केला. पण पहिल्या पाच वर्षात लोकांच्या लक्षात आले की, आपण विदर्भात खूप काम केले आहे. महाराष्ट्राच्या कुठल्याच भागावर अन्याय होऊन दिला नाही.

राजकारणात कुठल्याही पातळीवर जाऊन आव्हान निर्माण केली जातात. गेल्या दहा वर्षात पाहिले आहे, मी अशा आव्हानांचा सामना धैर्यपूर्वक करतो आणि सत्ता कधीही माझ्या डोक्यात जात नाही. सत्ता हे सेवेचे माध्यम आहे असेच आम्हाला शिकवले आहे. त्यामुळे पुढे ही सत्ता कधीच माझ्या डोक्यात जाणार नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नमूद केले.

पत्रकार परिषदेत बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठा आरक्षणापासून ते पालकमंत्रिपदापर्यंत अनेकविध विषयांवर संयमितपणे आणि स्पष्ट शब्दांत भाष्य केले. महायुती सरकारचे खातेवाटप झाल्यानंतर अनेकांनी नाराजीचा सूर आळवला. छगन भुजबळ यांनी मोर्चेबांधणी करत, अजित पवार यांच्यावर टीका केली. शरद पवार यांचेही कौतुक केले.

भाजपाकडे शिल्लक असलेले मंत्रीपद पदरात पाडून घेण्यासाठी छगन भुजबळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली होती. तर दुसरीकडे मनोज जरांगे पाटील पुन्हा एकदा सक्रीय झाले असून, सरकारला इशारा दिला आहे. परभणी आणि बीड प्रकरण विरोधकांनी लावून धरले आहे. या पार्श्वभूमीवर माध्यमांनी विचारलेल्या प्रश्नांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सविस्तरपणे उत्तरे दिली.

**पालकमंत्रीपदाबाबत निर्णय बावनकुळे घेणार**

चंद्रशेखर बावनकुळे हे इतर दोन्ही पक्षांसोबत बसून कुठे कोण पालकमंत्री असेल याचा निर्णय करतील. ते जो निर्णय करतील तो मला मान्य असेल. त्यांनी मला बीडला पाठवले तरी मी बीडला जाईन. पण माझ्या मते साधारणपणे मुख्यमंत्री स्वत:कडे कोणते पालकमंत्रीपद ठेवत नाहीत. असे असले तरी माझी इच्छा अशी आहे की, गडचिरोलीचे पालकमंत्रीपद माझ्याकडे ठेवावे. त्याला तिन्ही नेत्यांची परवानगी असेल तर ते होईल.

अर्थात या तीन नेत्यांनी मान्यता दिली तरच मी ते ठेवेन, असे सांगत देवेंद्र फडणवीस यांनी मन की बात बोलून दाखवली. तसेच आम्ही तिघे सोबतच काम करत आहोत.

अडीच वर्षांच्या कार्यकाळात आम्ही २०-२० चा सामना खेळलो. तो विश्वचषक आम्ही जिंकलो. पण आता कसोटीचा सामना असणार आहे. हा सामना ड्रॉ होणार नसून, हा जिंकणारा सामना असेल, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

## मांजापासून दुचाकी चालक सुरक्षा अनुषंगाने उपक्रम



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

दुचाकी वाहन चालवताना नायलॉन मांजामुळे होणाऱ्या दुखापती होण्याचे प्रमाण शहरात वाढले असून त्याच अनुषंगाने शहर वाहतूक शाखा-२ चे सर्व रायडर अंमलदार व रेल्वे स्टेशन हद्दीतील दुचाकी चालक यांच्या सुरक्षा अनुषंगाने दुचाकी वाहनासाठी प्रायोगिक तत्वावर ५० वाहनांना दुचाकी संरक्षक कवच बसवले असून ज्यामुळे नायलॉन मांजा चालकापर्यंत पोहोचू शकत नाही. व चालकाला दुखापत होणार नाही.

सदर योजनेत मा. पोलीस आयुक्त प्रवीण पवार साहेब, पोलीस उपायुक्त शीलवंत नांदेडकर साहेब, सहाय्यक पोलीस आयुक्त धनंजय पाटील साहेब, ह्यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक डॉ विवेक गणपत जाधव, सोबत सफौ अशोक कदम, पोह मनोहर पाटील, राजू मेहर, शामशोद्दीन कादरी, भगवान जगताप, संतोश काकडे, भरतसिंग दुलत, समाज सेवक मुसा खान यांनी विशेष सहकार्य केले आहे.

## जुन्या वाहनांना उच्च सुरक्षा नंबर प्लेट लावण्याचे आवाहन

**मुंबई –** सर्वोच्च न्यायालयाने सर्व वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी अर्थात हाय सिक्युरिटी नंबर प्लेट बसविण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार राज्य शासनाने १ एप्रिल २०१९ पूर्वी उत्पादीत केलेल्या वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांकाची नंबर प्लेट बसविण्याचा निर्णय घेतला आहे. अशा वाहनांना ही नोंदणी क्रमांकाची पाटी असणे बंधनकारक असणार आहे. तसेच १ एप्रिल २०१९ नंतर खरेदी केलेल्या वाहनांवर उत्पादकामार्फत उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांकाची नंबर प्लेट बसविण्यात आल्यामुळे अशा वाहनधारकांना पुन्हा ही नंबर प्लेट लावण्याची आवश्यकता नाही.

नोंदणीकृत वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांकाची नंबर प्लेट बसविणे सुरक्षेच्या दृष्टीने अत्यावश्यक आहे. तसेच रस्त्यावर धावणाऱ्या वाहनांची ओळख पटविणे, नंबर प्लेटमध्ये होणारी छेडछाड व बनावटगिरी रोखणे, वाहनांमुळे होणारे गुन्हे कमी करणे, यासाठी उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांकाची नंबर प्लेट महत्वाची आहे. तरी सर्व संबंधीत वाहनमालकांनी ही उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांकाची नंबर प्लेट बसविण्यासाठी परिवहन विभागाच्या https://transport.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी करावी. या कामासाठी परिवहन विभागाकडून तीन कंपन्यांची नेमणूक करण्यात आली असून त्यांच्यामार्फतच ही नंबर प्लेट लावणे बंधनकारक आहे. इतर कोणत्याही अनधिकृत विक्रेत्याकडून लावलेल्या नंबर प्लेटची नोंद केंद्र सरकारच्या डेटाबेसमध्ये होवू शकणार नाही. ही नंबर प्लेट बसविण्याकरिता ३१ मार्च २०२५ पर्यंत ऑनलाईन नोंदणी करावी. याविषयी काही अडचण, तक्रार किंवा शंका असल्यास परिवहन विभागाच्या पोर्टलवर किंवा dytccomp.tpt-mh@gov.in या ईमेलवर संपर्क करावा, असे आवाहन परिवहन आयुक्त विवेक भीमनवार यांनी केले आहे.

## कझाकिस्तानमध्ये विमान कोसळून चक्काचूर!

कझाकिस्तान : कझाकिस्तानमध्ये विमानाचा भीषण अपघात घडल्याचे समोर आले आहे. अझरबैजान एअरलाइन्सचे विमान अझरबैजानहून रशियाला जात असताना लँडींगदरम्यान विमानाचा अपघात झाला असल्याची माहिती मिळत आहे. सध्या घटनास्थळी बचावकार्य सुरु करण्यात आले असून सदर घटनेचा थरारक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अझरबैजानी प्रवासी विमान बाकूहून ग्रोंजीला जात होते. मात्र विमानाते तांत्रिक बिघाड झाल्यामुळे या विमानाचे आपत्कालीन लँडिंग करण्यात आले. परंतु विमान लँडिंग करत असताना ते धावपट्टीवर जोरात कोसळले अनब एका क्षणात विमानाने पेट घेतला. घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी तातडीने अग्निशमन दलाच्या गाड्या दाखल झाल्या असून आग विझवण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

रशियन वृत्तसंस्थांनी या अपघाताचा खुलासा केला आहे. त्यानुसार, अपघात झालेल्या विमानात ६७ प्रवासी आणि ५ क्रू मेंबरचा समावेश होता. यामधील ३८ जणांचा मृत्यू झाला असून एका लहान मुलासह २९ प्रवाशांचा जीव वाचवण्यात यश आले आहे. तर सर्व जखमींना तात्काळ रुग्णालयात हलवण्यात आले आहे. त्याचबरोबर तज्ञ, ट्रॉमाटोलॉजिस्ट, न्यूरोसर्जनसह सर्व बचाव पथके घटनास्थळी दाखल झाली आहेत. तसेच एअर अॅम्ब्युलन्सचीही व्यवस्था करण्यात आली आहे. घटनास्थळी मदतकार्य आणि बचावकार्य सुरू आहे.

# वाढती गुन्हेगारी

महाराष्ट्रात ठाणे, कल्याण, परभणी आणि बीडमध्ये अलीकडेच घडलेल्या घटनांमुळे सामाजिक स्वास्थ्य बिघडले आहे. चंगळवाद आणि परकीय संस्कृतीच्या अतिरेक्याने आपण आपली संस्कृती आणि आचारविचार पायदळी तुडवत असल्याच्या विकृतीने अशा घटनांना उत्तेजन मिळत आहे. ठाण्यातील एका शाळेत दोन चिमुरडींवर शाळेतील कर्मचाऱ्यानेच केलेल्या अत्याचाराच्या घटनेने महाराष्ट्रच नव्हे तर देश हादरला होता. शिक्षणाच्या पवित्र क्षेत्राला त्या गुन्हेगाराने कलंकित केले. त्याला फासावर चढवण्याच्या मागणीसाठी राज्यात ठिकठिकाणी जनतेला रस्त्यावर उतरावे लागले. सरकारनेही त्याला फासावर लटकवण्यासाठी प्रख्यात वकील नेमले होते. मात्र, निवडणुकीच्या तोंडावर ठाण्यातील या अत्याचाराच्या

घटनेचे विरोधकांकडून भांडवल केले जाऊ नये म्हणून त्या गुन्हेगाराचा एन्काऊंटर करुन पोलिसांनी त्यावर पडदा टाकला. त्यानंतर दिल्लीतील निर्भयापेक्षाही भयानक घटना कल्याण पूर्वमध्ये घडली. तेरा वर्षीय अल्पवयीन मुलीचे अपहरण करुन विशाल गवळी या नराधमाने तिच्यावर अत्याचार केला. नंतर तिची हत्या केली. घटना उघडकीस येऊ नये म्हणून मृतदेहाचे तुकडे करुन सुटकेसमध्ये भरले. या कटात त्याची तिसरी पत्नीही सहभागी होती. या क्रूरकर्म्याच्या मुसक्या आवळल्यानंतर त्याची पत्नी माफीचा साक्षीदार होण्यास तयार झाली. अत्यंत थंड डोक्याने केलेल्या या गुन्हेगाराला राजकीय मंडळींचा वरदहस्त असल्याची चर्चा आहे. आता या गुन्हेगारास कायद्यातील पळवाटांची संधी मिळू नये, कमीत कमी वेळेत त्याला यमसदनी पाठवण्यासाठी सरकारने त्वरेने कार्यवाही केली तरच अशा माथेफिरुंवर जरब बसेल. परभणीत महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोरील संविधानाची विटंबना केलेल्या समाजकंटकांमुळे महाराष्ट्रात काही दिवस तणावाचे वातावरण राहिले. जाळपोळ, रास्ता रोको, निदर्शने, मोर्चे यामुळे सामाजिक सुव्यवस्था बिघडली. सोमनाथ सूर्यवंशी या तरुणाचा पोलिसांच्या मारहाणीत मृत्यू झाला. परभणीच्या घटनेतील दोषी समाजकंटकालाही कठोर शिक्षा व्हावी तरच राष्ट्रपुरुषांच्या पुतळ्यांची विटंबना होण्याचे प्रकार थांबतील. बीड जिल्ह्यात मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करुन अत्यंत निर्घृणपणे हत्या झाली.

या घटनेला दोन आठवडे उलटले तरी गुन्हेगारांच्या मुसक्या आवळण्यात सरकार आणि पोलिसांना यश आले नाही. राजकीय नेत्यांच्या वलयाखाली असलेल्या गुंडाकडून सरपंचाची हत्या झाल्याचा आरोप होत आहे. अन्न व नागरी पुरवठामंत्री धनंजय मुंडे यांच्यामुळे त्या गुंडास अटक होत नसल्याचा जनतेसह विरोधी पक्षांची ओरड आहे. हत्येचा आरोप असलेल्या या गुंडावर खंडणीसह अनेक गुन्हे दाखल असताना त्याला राजकीय आश्रय देणारेही तितकेच दोषी आहेत. महाराष्ट्राची वाटचाल बिहारच्या मार्गावर जाते की काय, असे वाटते.

# भारतीय अर्थव्यवस्थेच्या वळणाचे जनक !

**(डॉ.मनमोहन सिंह श्रद्धांजली विशेष.)**

**भारताचे १४वे पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग हे एक विचारवंत व अभ्यासक म्हणून ओळखले जातात. त्यांचा कामाप्रती असलेला व्यासंगी व शैक्षणिक दृष्टिकोन, जनसामान्यांसाठी असलेली उपलब्धता व विनम्र आचरणामुळे त्यांच्याकडे आदराने बघितले जाते. कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा सदर लेख अभ्यासा... संपादक.म**

माजी पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांचा जन्म दि.२६ सप्टेंबर १९३२ रोजी अखंड भारताच्या पंजाब प्रांतातील एका खेड्यात झाला. डॉ.सिंग यांनी सन १९४८ साली पंजाब विद्यापीठातून आपले उच्च शालेय शिक्षण पूर्ण केले. त्यांचे शैक्षणिक कर्तृत्व पंजाब विद्यापीठापासून इंग्लंड मधील केम्ब्रिज विद्यापीठापर्यंत विस्तारलेले आहे. सन १९५७ साली त्यांनी केम्ब्रिज विद्यापीठातून अर्थशास्त्र या विषयात प्रथम श्रेणीमध्ये पदवी प्राप्त केली. त्यानंतर सन १९६२ साली डॉ.सिंग यांनी ऑक्सफ्फ़ोर्ड विद्यापीठाच्या नफ्फ़िल्ड महाविद्यालयातून अर्थशास्त्र या विषयात डी फ्फ़ील संपादन केले. त्यांचे इंडियाज एक्स्पोर्ट ट्रेंड्स अन्ड प्रोस्पेक्ट्स फ्फ़ोर सेल्फ्फ़ ससटेन्ड ग्रोथ हे पुस्तक भारताच्या अंतस्थ व्यापारी धोरणाची समीक्षा करणारे आहे. सर्व सामान्यांचे मत आहे की, असा अर्थमंत्री पुन्हा होणे नाही. माजी पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंह यांचा अल्पपरिचय- डॉ.मनमोहन सिंह यांनी सन १९९१मध्ये केंद्रीय अर्थमंत्री असताना उदारीकरणाचा घेतलेला निर्णय ऐतिहासिक ठरला. त्यांच्या या निर्णयाने देशाच्या अर्थव्यवस्थेला एका वेगळ्या उंचीवर नेलं. डॉ.मनमोहन सिंह यांच्या उदारीकरणाच्या निर्णयाने देशाच्या अर्थव्यवस्थेला बळकट केलं. डॉ.मनमोहन सिंह यांनी देशाला यशाच्या एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवलं. भारतीय अर्थव्यवस्थेच्या वळणाचे जनक म्हणून डॉ.मनमोहन सिंग यांना ओळखले जाते. डॉ.मनमोहन सिंग यांनी भारताचे १४वे पंतप्रधान होते. डॉ.मनमोहन सिंग हे एक विचारवंत आणि अभ्यासक म्हणून ओळखले जातात. त्यांचा कामाप्रती असलेला शैक्षणिक दृष्टिकोन, जनसामान्यांसाठी असलेली उपलब्धता आणि विनम्र आचरणामुळे ते कायमच चर्चेत असायचे.

डॉ.मनमोहन सिंग यांनी पंजाब विद्यापीठ आणि दिल्ली स्कूल ऑफ्फ़ इकोनोमिक्समध्ये प्राध्यापक म्हणून काम केले. या काळात त्यांनी युएनसीटीएडी सचिवालयात काही काळ काम केले. यानंतर सन १९८७ आणि १९९० या काळात त्यांची जीनिव्हा येथील साऊथ कमिशनच्या सरचिटणीसपदी नियुक्ती झाली. डॉ. मनमोहन सिंग यांनी सन १९७१ साली वाणिज्य मंत्रालयात आर्थिक सल्लागार म्हणून जबाबदारी स्वीकारली. यानंतर सन १९७२ साली डॉ.मनमोहन सिंग यांची अर्थमंत्रालयात प्रमुख आर्थिक सल्लागार म्हणून नियुक्ती झाली. त्यांनी अर्थमंत्रालयात अनेक महत्वाची पदे भूषवली. यात अर्थ मंत्रालयाचे सचिवपद, नियोजन आयोगाचे उपाध्यक्षपद, रिझर्व बँकेचे गव्हर्नरपद, पंतप्रधानांचे प्रमुख आर्थिक सल्लागार आणि विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्षपद या पदांचा समावेश होता. यानंतर सन १९९१-१९९६ या पाच वर्षांच्या काळात ते भारताचे अर्थमंत्री होते. हा काळ स्वतंत्र भारताच्या आर्थिक इतिहासातील मैलाचा दगड मानला जातो. डॉ.मनमोहन सिंग यांनी भारताच्या आर्थिक सुधारणा अमलात आणण्यासाठी आवश्यक असलेले धोरण तयार केले. त्यांच्या कारकिर्दीत त्यांना अनेक महत्वाचे पुरस्कार मिळाले. डॉ.मनमोहन सिंग यांना सन १९८७ या काळात भारतातील दुसरा सर्वोच्च नागरी पुरस्कार पद्मविभूषण मिळाला. त्यानंतर भारतीय विज्ञान काँग्रेसमध्ये देण्यात येणारा जवाहरलाल नेहरू जन्मशताब्दी सन्मान- १९९५, अर्थमंत्र्यांसाठी दिला जाणारा आशिया मनी अवार्ड- १९९३ आणि १९९४, केम्ब्रिज विद्यापीठाचा ॲडम स्मिथ पुरस्कार- १९५६, केम्ब्रिजमधील सेंट जॉन महाविद्यालयात उल्लेखनीय कार्याबद्दल राईट पुरस्कार, असे काही विशेष पुरस्कार मिळाले. याशिवाय जपान निहोन कायझाई शिम्बूनसारख्या अनेक संस्थांनी त्यांना सन्मानित केले. केम्ब्रिज आणि ऑक्सफ्फ़ोर्डसारख्या अनेक विद्यापीठांकडून डॉ.मनमोहन सिंग यांना मानद पदवी प्रदान करण्यात आली. त्यांनी अनेक आंतरराष्ट्रीय परिषदा आणि संघटनांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले. त्यांनी सन १९९३मध्ये सायप्रस येथे राष्ट्रकुल प्रमुखांच्या बैठकीत आणि व्हिएन्ना येथे मानवाधिकारावरील जागतिक परिषदेत भारतीय प्रतिनिधी मंडळाचे नेतृत्व केले. डॉ.मनमोहन सिंह यांनी सन २००४ ते २००९ असे दोन वेळा भारताचे पंतप्रधान पद भूषवले. लोकसभेची निवडणूक न जिंकणारे आणि राज्यसभेचे सदस्य असताना हे पद भूषविणारे ते पहिले पंतप्रधान होते. त्यांच्या कार्यकाळात आर्थिक विकास आणि सामाजिक नियोजनावर विशेष भर देण्यात आला.

भारताचे दिग्गज माजी पंतप्रधान, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ.मनमोहन सिंह यांचं दि.२६ डिसेंबर, गुरुवारी निधन झालं. ते ९२ वर्षांचे होते. दिल्लीतील एम्स रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला. देशभरात शोककळा पसरली आणि राजकीय वर्तुळात सात दिवसांचा दुःखवटा जाहीर करण्यात आला आहे. डॉ.मनमोहन सिंग यांच्या पश्चात पत्नी गुरशरण कौर आणि तीन मुली असा परिवार आहे. साहित्य, संगीत आणि अध्यात्मांत त्यांना प्रचंड रस होता. डॉ.मनमोहन सिंह यांच्या निधनाचे वृत्त समजताच देशभरात शोककळा पसरली.

!! भारताचे महान नेते डॉ.मनमोहन सिंग यांच्या पावन चरणी सप्ताहभर ही श्रद्धासुमने समर्पित !!



- संकलन व शब्दांकन -
**श्री एन. के. कुमार**
जी. से.नि.अध्यापक.
गडचिरोली मोबा- ७७७५०४१०८६.

# महाराष्ट्राच्या करीना थापा आणि केया हटकर 'प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कारा'ने सन्मानित

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

महाराष्ट्राच्या दोन धाडसी आणि प्रेरणादायी मुलींच्या शौर्य आणि प्रतिभेचा सन्मान राष्ट्रीय स्तरावर करण्यात आला. अमरावतीच्या करीना थापाला शौर्यासाठी तर मुंबईच्या केया हटकरला तिच्या साहित्य व सामाजिक कार्यासाठी 'प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कारा'ने राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

राष्ट्रपती भवनात झालेल्या कार्यक्रमात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. यावेळी केंद्रीय महिला आणि बाल विकास मंत्री श्रीमती अन्नपूर्णा देवी, राज्यमंत्री श्रीमती सावित्री ठाकूर व महिला आणि बाल विकास मंत्रालयाचे सचिव अनिल मलिक उपस्थित होते. या पुरस्काराचे स्वरूप पदक, सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र असे असून, यंदा १४ राज्यांमधील१० मुली व ७ मुले असे एकूण १७ मुलांना गौरविण्यात आले. यामध्ये शौर्य, विज्ञान-तंत्रज्ञान, कला-संस्कृती, समाजसेवा, क्रीडा आणि पर्यावरण यांसारख्या विविध क्षेत्रांतील असामान्य कामगिरी करणाऱ्या मुला-मुलींचा समावेश आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या आवाहनावरून २०२२ पासून २६ डिसेंबर या दिवशी 'वीर बाल दिवस' म्हणून दोन्ही साहिबजादा बाबा जोरावरसिंग व बाबा फ्फ़तेहसिंग यांना अभिवादन व शौर्याचे स्मरण करण्यात येते. शिख धर्मातील दहावे गुरु, गुरु गोबिंद सिंग यांचे सुपुत्र बाबा जोरावर सिंग (वय ९) आणि बाबा फ्फ़तेहसिंग (वय ५) यांच्या अव्दितीय शौर्याला समर्पित या दिवसाला विशेष महत्त्व आहे. त्यांच्या बलिदानाचे स्मरण म्हणून हे पुरस्कार प्रजासत्ताक दिनाएवजी वीर बाल दिवस म्हणजेच २६ डिसेंबर रोजी राष्ट्रपती भवनात समारंभपूर्वक प्रदान करण्यात येतात. करीना थापाचे शौर्य: ७० कुटुंबांचे प्राण वाचवले - अमरावतीच्या कठोरा परिसरातील जय अंबा अपार्टमेंटमध्ये १५ मे २०२४ रोजी लागलेल्या भीषण आगीच्या घटनेत करीना थापाने ७० कुटुंबांचे प्राण वाचवले. बी-विंगमधील एका फ्लॅटमध्ये आग लागल्याचे दिसताच, करिनाने प्रसंगावधान दाखवत कुलूप तोडून आत प्रवेश केला. सिलेंडरजवळील आग आटोक्यात आणत सिलेंडर बाहेर काढल्याने मोठा स्फ्फ़ोट होण्याची भीती टळली. तिच्या शौर्याची दखल घेत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते राष्ट्रपती भवनात 'प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

केया हटकर: साहित्य आणि समाजकार्याची ओळख - मुंबईच्या केया हटकरने अपंगत्वावर मात करत आपली ओळख राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रस्थापित केली आहे. तिच्या 'डान्सिंग ऑन माय व्हिल्स' आणि 'आय एम पॉसीबल' ही दोन्ही पुस्तके जागतिक स्तरावर नावाजले गेले आहेत. १३ वर्षांच्या केयाने दोन वेळा राष्ट्रीय पुरस्कार पटकावला असून तिचे साहित्य २६ देशांमध्ये लोकप्रिय ठरले आहे. केयाला १० महिन्यांपासून स्पायनल मस्क्युलर ॲट्रॉफी या आजाराने ग्रसित आहे, ज्यामुळे ती कायमस्वरूपी व्हीलचेअरवर असते. मात्र, तिने हा आजार तिच्या यशाच्या मार्गातील अडथळा होऊ दिला नाही. तिच्या साहित्य व सामाजिक कार्याची दखल घेत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते राष्ट्रपती भवनात 'प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार' ने सन्मानित करण्यात आले.

भारत मंडपम येथे राष्ट्रीय कार्यक्रमाचे आयोजन- पुरस्कार वितरण कार्यक्रमानंतर राजधानीतील भारत मंडपम येथे केंद्रीय महिला व बालविकास मंत्रालयाकडून आयोजित करण्यात आलेल्या वीर बाल दिवसाच्या राष्ट्रीय कार्यक्रमात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय मंत्री श्रीमती अन्नपूर्णा देवी उपस्थित होते. हा कार्यक्रम युवा प्रतिभेला प्रोत्साहन देण्यासाठी व त्यांच्या अतुलनीय गुणांची दखल घेऊन, भविष्यात नवीन भारताच्या निर्मितीसाठी लक्ष केंद्रित करण्यासाठी आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाच्या उद्घाटन भाषणात श्रीमती अन्नपूर्णा देवी यांनी मुलांच्या रचनात्मकतेला प्रोत्साहन देण्याचे महत्त्व सांगितले आणि वीर बाल दिवसाचे उद्देश स्पष्ट केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुपोषित पंचायत अभियानाचे उद्घाटन केले. पोषण संबंधित सेवांची अंमलबजावणी बळकट करून आणि सक्रिय सामुदायिक सहभाग सुनिश्चित करून पोषण परिणाम आणि कल्याण हे या कार्यक्रमाचे उद्दिष्ट असल्याचे सांगितले. या कार्यक्रमात पंतप्रधान राष्ट्रीय बाल पुरस्कार विजेते आणि मान्यवर व्यक्तींसह सुमारे ३५०० मुले सहभागी झाली.

मुलांनी विविध भारतीय संस्कृतींचे प्रतिनिधित्व करणारे सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले आणि विविध संस्कृतींचे प्रतिनिधित्व करणाऱ्या मार्च पास्टमध्ये भाग घेतला. यासोबतच, युवा मनांना गुंतवून ठेवण्यासाठी, या दिवसाच्या महत्त्वाविषयी जागरूकता वाढवण्यासाठी आणि देशाप्रती धैर्य आणि समर्पणाची संस्कृती वाढवण्यासाठी देशभरात विविध उपक्रम राबवले जातील. MyGov आणि MyBharat पोर्टलच्या माध्यमातून परस्पर संवादात्मक प्रश्नमंजुषेसह ऑनलाईन स्पर्धांची मालिका आयोजित केल्या जातील. शाळा, बालसंगोपन संस्था आणि अंगणवाडी केंद्रांमध्ये कथाकथन, सर्जनशील लेखन, भित्तीचित्रे तयार करणे यासारखे मनोरंजक उपक्रम हाती घेतले जातील, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

# जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण (दिशा) समिती बैठक जलजिवन मिशन कामांचा स्वतंत्र समितीमार्फत आढावा

## येत्या १० जानेवारीला प्रत्यक्ष गावात पाहणी- खा.भुमरे

**छत्रपती संभाजीनगर** - प्रत्येक घरी नळाद्वारे पाणीपुरवठा करणारी महत्त्वाकांक्षी योजना जलजिवन मिशन अंतर्गत जिल्ह्यात होत असलेल्या कामांच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी एक स्वतंत्र समिती गठित करावी. तसेच या समितीने येत्या १० जानेवारीला प्रत्यक्ष गावात जाऊन कामांची सद्यस्थिती पहावी,असे निर्देश जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण अर्थात 'दिशा' समितीचे अध्यक्ष खा. संदिपान भुमरे यांनी आज दिले.

जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण अर्थात दिशा समितीची बैठक आज जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात पार पडली. अध्यक्षस्थानी खासदार संदिपान पाटील भुमरे हे होते. तसेच राज्याचे इतर मागास वर्ग व बहुजन कल्याण, तसेच दुग्धविकास व उर्जा नुतनीकरण मंत्री अतुल सावे, विधानसभा सदस्य आ. प्रशांत बंब, आ. रमेश बोरनारे, आ.संजना जाधव, आ. अनुराधा चव्हाण, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, मनपा आयुक्त जी. श्रीकात, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, स्मार्ट सिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी जगदीश मिणीयार, अपर मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.सुनिल भोकरे, निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर तसेच सर्व यंत्रणा प्रमुख आदी उपस्थित होते. प्रारंभी माजी




पंतप्रधान मनमोहनसिंग यांच्या निधनाबद्दल दोन मिनिटे मौन पाळून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. बैठकीत केंद्रशासनामार्फ्फ़त राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांचा आढावा घेण्यात आला. त्यात प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, प्रधानमंत्री पीक विमा योजना, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, प्रधानमंत्री आवास योजना (शहरी), स्वच्छ भारत मिशन शहरी, जलजीवन मिशन, एकीकृत बालविकास योजना, प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण अभियान, समग्र शिक्षा अभियान, राष्ट्रीय स्वास्थ्य मिशन, महात्मा गांधी ग्रामिण रोजगार हमी योजना, राष्ट्रीय सामाजिक सहायता कार्यक्रम अशा विविध योजनांचा आढावा घेण्यात आला. जिल्ह्यात जलजिवन मिशन अंतर्गत झालेल्या नळ पाणीपुरवठा योजनांच्या कामांची सद्यस्थिती जाणून घेणे आवश्यक असल्याचे मत आ. प्रशांत बंब यांनी मांडले. त्यावर झालेली कामे, प्रगतीपथावर असलेली कामे, प्रत्यक्षात सुरु न होऊ शकलेली कामे यांचा आढावा घेण्यासाठी स्वतंत्र स्थानिक समिती तयार करण्याचे निर्देश खा. भुमरे यांनी दिले. शुक्रवार दि.१० जानेवारी २०२५ रोजी प्रत्यक्ष गावात जाऊन कामांची पाहणी समिती करेल असेही निर्देश खा. भुमरे यांनी दिले. जिल्ह्यात अंगणवाडी बांधकामाबाबत चर्चा करण्यात आली. जिल्ह्यात ५६८ अंगणवाडी खोल्या बांधकामाची गरज असल्याची माहिती बैठकीत सादर करण्यात आली. आता पर्यंत केवळ २४ अंगणवाडी खोल्यांचे बांधकाम हे जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून झाले असल्याचेही सांगण्यात आले. या संदर्भात राज्य शासन स्तरावर पाठपुरावा करावा,असेही समितीने ठरविले. छत्रपती संभाजीनगर शहर पाणीपुरवठा योजनेच्या जलवाहिनीचे कामाच्या सद्यस्थितीबाबतही बैठकीत चर्चा झाली. मंत्री श्री. सावे यांनी हा मुद्दा मांडला. जलवाहिन्या टाकतांना भविष्यातील देखभाल दुरुस्तीचा मुद्दा विचारात घेऊन काम करण्यात यावे,अशी सुचना त्यांनी मांडली. याबाबत राष्ट्रीय महामार्ग व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, महानगरपालिका व सर्व संबंधित लोकप्रतिनिधी यांची मिळून जलवाहिनी व रस्त्याच्या कामामुळे प्रभावित होणाऱ्या गावांच्या समस्यांबाबत चर्चा करण्यासाठी सोमवार दि.३० रोजी विशेष बैठक बोलवावी, असे निर्देश खा. भुमरे यांनी दिले. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी शाळा दुरुस्ती व सुविधांच्या विकासाचे कामे मनरेगा मधून सुरु करण्यात येत असलेल्या प्रयत्नांची माहिती सभागृहाला दिली. जिल्ह्यात पालकमंत्री असतांनाच्या कार्यकाळात खा. भुमरे यांनी रोजगार हमी योजनांच्या कामांमध्ये सुसुत्रता आणून योजनेच्या माध्यमातून आमुलाग्र बदल ग्रामीण भागात झाला असे आ. बोरनारे यांनी सांगितले. जिल्ह्यात केंद्राच्या विविध योजनांचा लाभ सामान्य जनतेपर्यंत पोहोचवावा. त्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे,असे निर्देश खा. भुमरे यांनी दिले.

## सामना सुरु असतानाच सुरक्षा तोडून चाहता घुसला मैदानात अन् विराटसोबत केला डान्स!



मेलबर्न : कालपासून भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया यांच्यामध्ये चौथ्या कसोटीला सुरुवात झाली आहे. हा सामना सुरु झाल्यापासून सातत्याने नवनवीन घटना घडत आहेत. अनेक चाहते त्यांच्या आवडत्या क्रिकेटरला भेटण्यासाठी नेहमीच आतुरतलेले असतात.

अशातच आज भारत-ऑस्ट्रेलिया मेलबर्न कसोटीत एक चाहता रोहित शर्मा आणि विराट कोहलीला (तळीरीं घेहश्रळ) भेटण्यासाठी सुरक्षा तोडून थेट मैदानात घुसल्याचे समोर आले आहे. इतकेच नव्हे तर त्याने डान्स देखील केला आहे. या घटनेचा सर्व व्हिडीओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे.

भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया सामन्यात ऑस्ट्रेलिया पहिल्या डावात फफ्रलंदाजी करत असताना ९७ व्या षटकाच्या तिसऱ्या चेंडूनंतर एक प्रेक्षक स्टेडियमची सुरक्षा भेदून मैदानात आला. त्यानंतर तो पहिला स्लीपच्या दिशेला वळाला तिथे रोहित शर्मा उभा होता. पण त्याआधी विराट कोहली मध्ये दिसल्याने तो त्याच्याजवळ गेला आणि काही कळायच्या आत त्याच्या गळ्यात हात टाकून डान्स करु लागला. तसेच त्याने विराट कोहलीला मिठी मारण्याचा प्रयत्न केला पण तितक्यात सुरक्षारक्षकांनी त्याला पकडत मैदानाबाहेर नेले.

दरम्यान, यामुळे काही काळ सामना थांबला होता. या घटनेचा व्हिडिओही सध्या व्हायरल होत आहे. दरम्यान, अशा प्रकारे एखाद्या प्रेक्षकाने मैदानात घुसण्याची पहिली वेळ नाही. यापूर्वीही अनेकदा स्टेडियमची सुरक्षा भेदून प्रेक्षक मैदानात खेळाडूंना भेटण्यासाठी घुसले आहेत सामन्याबद्दल सांगायचे झाले, तर ऑस्ट्रेलियाचा पहिला डाव दुसऱ्या दिवशी १२२.४ षटकात ४७४ धावांवर संपुष्टात आला. ऑस्ट्रेलियाकडून स्टीव्ह स्मिथने सर्वाधिक धावा केल्या.

## 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बसस्थानक अभियान' एसटीत पुन्हा सुरू करणार!

### परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची घोषणा

पनवेल : स्वच्छ बस स्थानक सुंदर व निटनेटके बसस्थानक, परिसर आणि प्रसन्न स्वच्छतागृहाची सेवा उपलब्ध करून देणे हे एसटी प्रशासनाचे मुलभूत कर्तव्य आहे. त्यासाठी 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बस स्थानक अभियान' राबवून राज्यभरातील सर्व बसस्थानकांचा कायापालट करणे हा आमचा उद्देश आहे, असे प्रतिपादन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले. त्यांनी आज पनवेल व खोपोली बसस्थानकाला भेट दिली. त्यावेळी ते बोलत होते.

आधुनिक युगामध्ये 'स्वच्छता' हा कोणत्याही व्यवसायाचा मूलभूत पाया असतो. त्यामुळे प्रवासी सेवेमध्ये प्रवाशांना स्वच्छ, सुंदर बसस्थानक, बस स्थानकाचा परिसर आणि तेथील सुस्थितीतील प्रसाधनगृहे पुरवण्याला भविष्यात आमच्याकडून प्राधान्य देण्यात येईल. याबरोबरच प्रत्येक आगारात चालक, वाहक आणि यांत्रिकी कर्मचाऱ्यांसाठी असलेली विश्रांतीगृह देखील स्वच्छ आणि निटनेटकी असावित यासाठी देखील आम्ही प्रयत्न करणार आहोत, असे त्यांनी सांगितले.

या भेटीमध्ये मंत्री सरनाईक यांनी बसस्थानकावरील प्रसाधनगृहाला भेट देऊन तेथील प्रशासनाला अस्वच्छतेबाबत खडे बोल सुनावले. तसेच बसस्थानकावरील आरक्षण खिडकी, पिण्याच्या पाण्याची सोय याची पहाणी केली. फफ्रलाटावर जाऊन प्रवाशांशी संवाद साधला, त्यांच्या तक्रारी ऐकून घेतल्या. तसेच त्यांच्या तक्रारीचे तातडीने निवारण करण्याचे निर्देश उपस्थित एसटी अधिकाऱ्यांना दिले.

**पनवेल ते खोपोली एसटी बसमधून प्रवास** – या भेटीमध्ये मंत्री प्रताप सरनाईक यांनी सर्वसामान्य प्रवाशांच्या बरोबर पनवेल ते खोपोली या मार्गावर एसटीच्या लालपरीतून प्रवास केला. या प्रवासादरम्यान त्यांनी प्रवाशांशी संवाद साधला. बसमधील सहप्रवासी महाविद्यालयीन विद्यार्थी -विद्यार्थ्यांनी, ज्येष्ठ नागरिक, सर्वसामान्य प्रवासी यांनी बसेसच्या फेऱ्या वाढविण्यात याव्यात, बसेस स्वच्छ व यांत्रिक दृष्टीने निर्दोष असावेत, अशी मागणी केली.

यावेळी मंत्री सरनाईक म्हणाले की, लवकरच एसटीच्या ताफ्यामध्ये नव्या बसेस उपलब्ध होत आहेत. या बसेस आल्यानंतर पनवेल – खोपोली, पनवेल – अलिबाग आणि पनवेल – कल्याण या मार्गावर नवीन बसेस उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करण्यात येईल, असे आश्वासन दिले.

बसस्थानक परिसरातील स्क्रॅप वाहने तातडीने हलविण्याचे निर्देश

प्रवाशांच्या वाहतुकीची गैरसोय करून परिवहन विभाग व अन्य विभागांनी बस स्थानकाच्या परिसरात अडगळीत टाकलेली स्क्रॅप वाहने तातडीने इतर ठिकाणी उचलून न्यावीत, असे निर्देश यावेळी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले.

## मुंबई हल्लयाचा सूत्रधार, मोस्ट वाँटेड दहशतवादी अब्दुल रहमान मक्कीचा मृत्यू



**लाहोर :** मुंबई हल्ल्याचा कथित मास्टरमाइंड हाफिज सईदचा मेहुणा आणि बंदी घातलेल्या जमात-उद-दावाचा उपप्रमुख हाफिझज अब्दुल रहमान मक्की याचा लाहोरमधील एका खाजगी रुग्णालयात मृत्यू झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मक्कीला हृदयविकाराचा झटका आला. अब्दुल रहमान मक्की हा गेल्या काही दिवसांपासून आजारी होता आणि लाहोर मधील एका खाजगी रुग्णालयात उच्च मधुमेहावर उपचार घेत होता. मक्की याला आज सकाळी हृदयविकाराचा झटका आला आणि त्याने रुग्णालयात अखेरचा श्वास घेतला, असे जमात-उद-दावाच्या पदाधिकाऱ्याने सांगितले.

अब्दुल रहमान मक्की याला हाफिज अब्दुल रहमान मक्की या नावानेही ओळखले जाते. त्याचा जन्म पाकिस्तानातील पंजाब प्रांतातील बहावलपूर येथे झाला. मक्की दीर्घकाळापासून हाफिज सईदच्या अगदी जवळचा सहकारी आहे. त्याने लष्कर आणि जमात-उद-दावा मध्येही अनेक महत्त्वाच्या पदांवर काम केले आहे. राजकीय प्रमुख आणि लष्करासाठी निधी उभारणे यासारखी कामेही मक्कीने हाताळली. २००० मध्ये लाल किल्ला आणि २००८ मध्ये मुंबईतील ताज हॉटेलवर झालेल्या दहशतवादी हल्लयांसाठी मक्कीला भारतीय एजन्सींनी आरोपी मानले होते. अमेरिकेच्या वित्त विभागाने २०१० मध्ये त्याचा जागतिक दहशतवाद्यांच्या यादीत समावेश केला होता.

**६ महिने तुरुंगवास–** जेयूडी प्रमुख हाफिज सईदचा मेहुणा मक्की याला दहशतवादविरोधी न्यायालयाने २०२० मध्ये दहशतवादाला वित्तपुरवठा केल्याप्रकरणी सहा महिन्यांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावली होती. जेयूडीचे उपप्रमुख मक्की दहशतवादाला आर्थिक मदत केल्याप्रकरणी शिक्षा झाल्यापासून चर्चेत होता.

पाकिस्तान मुताहिदा मुस्लिम लीग ने एका निवेदनात म्हटले आहे की मक्की हा पाकिस्तानी विचारसरणीचा समर्थक होता. २०२३ मध्ये, मक्कीला संयुक्त राष्ट्रांनी जागतिक दहशतवादी घोषित केले होते. त्याची मालमत्ता गोठवण्यात आली होती. तसेच त्याच्यावर प्रवास बंदी आणि शस्त्रास्त्र निर्बंध घालण्यात आले होते. भारताविरोधात प्रक्षोभक वक्तव्य केले- मक्की त्याच्या भारतविरोधी भाषणांसाठी पाकिस्तानमध्ये प्रसिद्ध होता. २०१७ मध्ये, त्याचा मुलगा, ओवैद रहमान मक्की, जम्मू आणि काश्मीरमध्ये भारतीय सुरक्षा दलाच्या कारवाईत मारला गेला.

युनायटेड स्टेट्स ट्रेझरी डिपार्टमेंटने मक्की याला आंतरराष्ट्रीय दहशतवादी म्हणून घोषित केले आहे. मुंबई हल्लयासाठी निधी देण्यात आला – अब्दुल रहमान मक्कीचे नावही मुंबईतील हल्ल्यांशी जोडले गेले होते. मिळालेल्या माहितीनुसार, २६/११ च्या मुंबई दहशतवादी हल्लयासाठी दहशतवाद्यांना निधी उपलब्ध करून देण्यात आला होता. या हल्लयात १६६ लोकांचा मृत्यू झाला होता. या हल्लयाविरोधात लष्कराने केलेल्या कारवाईत एकूण नऊ दहशतवादीही ठार झाले. यावेळी दहशतवादी अजमल कसाबला जिवंत पकडण्यात आले होते.

## १३ वर्षीय चिमुकली खाऊ आणायला गेली मात्र घरी परतलीच नाही

**कल्याण (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

कल्याण पूर्वमध्ये माणुसकीला काळीमा फासणारी घटना घडली आहे. खाऊ आणायला गेलेली १३ वर्षीय चिमुकली घरी परतलीच नाही. पीडित मुलगी सोमवारी आईकडून २० रुपये घेऊन खाऊ आणायला गेली होती. मात्र रात्री ती घरी पोहोचली नाही. यानंतर कुटुंबीयांनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. मंगळवारी कल्याण-पडघा रस्त्याच्या कडेला एका झुडपात मुलीचा मृतदेह सापडला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सोमवारी सायंकाळी साडेचार वाजता पीडित मुलगी आईकडून २० रुपये घेऊन खाऊ आणण्यासाठी घराबाहेर पडली होती. पण सायंकाळी उशिरापर्यंत मुलगी घरी आली नाही, त्यानंतर मुलीच्या आईनं तिला शोधायला सुरुवात केली. सर्वत्र शोधाशोध करूनही मुलगी सापडत नाही, हे लक्षात आल्यानंतर महिलेनं आपल्या पतीला मुलगी सापडत नसल्याचं सांगितलं. यानंतर मुलीच्या वडीलही कामावरून तातडीनं घरी आले, दोघांनीही मुलीला शोधायला सुरुवात केली. पण मुलगी कुठेच सापडली नाही. यानंतर दाम्पत्यानं कोळशेवाडी पोलीस ठाण्यात जाऊन मुलगी बेपत्ता झाल्याचा गुन्हा दाखल केला. त्यानंतर मंगळवारी कल्याण-पडघा रस्त्यावरील निर्जनस्थळी एका झुडपात मुलीचा मृतदेह आढळला आहे. हे ठिकाण मुलीच्या घरापासून १३ किलोमीटर दूर आहे. मुलीवर लैंगिक अत्याचार करून मग तिची हत्या केल्याची माहिती समोर आली आहे. पोलिसांनी पीडितेचा मृतदेह शवविच्छेदनासाठी जेजे रुग्णालयात दाखल केला आहे. पोलीस या घटनेचा तपास करत आहेत.

मागील वर्षी शेजारी राहणाऱ्या तरुणाने माझ्या मुलीची छेड काढली होती. यावरून वाद झाल्यानंतर आरोपीनं तुम्हाला गंभीर परिणाम भोगावे लागतील, अशी धमकी दिली होती. त्यामुळे माझ्या मुलीची हत्येत त्याचाच सहभाग असावा, त्या अनुषंगाने पोलिसांनी तपास करावा, अशी विनंती मुलीच्या वडिलांनी केली आहे. सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या आधारे पोलीस शोध घेत आहेत.

## वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या चारचाकी वाहनांची जप्ती कारवाई

छत्रपती संभाजीनगर, दि. २७ (प्रतिनिधी) – महानगरपालिका आणि शहर वाहतूक पोलिस यांच्या संयुक्त कारवाई ने शहरातील गजबजलेल्या भागातून रहदारीस अडथळा निर्माण करणाऱ्या चारचाकी वाहनांची जप्ती कारवाई करण्यात येत आहे.

रोषण गेट ते आझाद चौक व कटकट गेट ते एस.पी बंगला या रस्त्यावरील दुभाजकाला खेटून वाहतुकीस अडथळा निर्माण होईल असे चारचाकी व तीन चाकी वाहने अवैध रित्या उभे करण्यात आले होते.मां.आयुक्त महोदय यांच्या ही बाब निदर्शनास आल्यानंतर त्यांनी सदरील वाहने जप्त करण्याचे आदेश दिले होते. या अनुषंगाने सदर कारवाई मां.आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांच्या आदेशानुसार व अतिरिक्त आयुक्त तथा अतिक्रमण विभाग प्रमुख संतोष वाहुळे यांच्या मार्गदर्शनाखाली महानगरपालिकेच्या माजी सैनिक पथक प्रमुख प्रमोद जाधव यांच्या नेतृत्वात माजी सैनिक वॉर्डन पथक व शहर वाहतूक पोलिस यांच्या संयुक्त पथकाने एकूण तीन चाकी व चारचाकी २५ वाहने जप्त करून गरवारे क्रीडा संकुल येथे जमा करण्यात आले आहेत. सदरील कारवाई या पुढेही या प्रकारे सुरू राहणार असून ज्या नागरिकांनी रहदारीस अडथळा निर्माण होईल असे वाहने रस्त्यावर उभे केले असतील अशी वाहने तत्काळ काढून घ्यावी अन्यथा मनपा प्रशासन वाहने जप्त करताना जर काही नुकसान झाले तर त्यास जबाबदार राहणार नाही असे प्रशासनाच्या वतीने कळविण्यात आले आहे.

## श्रीयशच्या बावीस विद्यार्थ्यांची कॅम्पस मुलाखतीमध्ये निवड



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

श्रीयश अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या सेंट्रल ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेलने या आठवड्यात अभियांत्रिकी आणि एमबीएच्या विद्यार्थ्यांसाठी मोठ्या प्रमाणावर कॅम्पस प्लेसमेंट ड्राइव्ह आयोजित केला. या मेळाव्यात बीजी लिन इलेक्ट्रिकल्स, एव्हर इलेक्ट्रॉनिक्स पुणे, औरंगाबाद ऑटो अँन्सिलरी, यशश्री प्रेस कॉम्प, अजाईल टेक्नॉलॉजी सोल्यूशन्स, ग्राइंड मास्टर मशीन्स आणि इन्फिफ्रसोल एनर्जी अशा नामांकित कंपन्यांनी सहभाग घेतला. कंपन्यांनी प्लेसमेंट प्रक्रियेत प्री-प्लेसमेंट सत्रे, ऑनलाईन आणि ऑफफ्रलाईन तांत्रिक चाचण्या, तसेच तांत्रिक व एचआर मुलाखती घेतल्या. या चाचण्यांद्वारे विद्यार्थ्यांची तांत्रिक कौशल्ये, सकारात्मक दृष्टीकोन, औद्योगिक तयारी आणि कार्यक्षमतेची चाचपणी करण्यात आली. ही मुलाखत प्रक्रिया बी. टेक. यांत्रिक, विद्युत, इलेक्ट्रॉनिक्स, संगणक शाखा आणि एमबीए मार्केटिंग व एचआर शाखांसाठी आयोजित करण्यात आली होती.

सेंट्रल ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेल प्रमुख प्रा. अनिल पालवे म्हणाले की, ङआम्हाला उद्योग क्षेत्राकडून उत्तम प्रतिसाद मिळत असून, आम्ही उद्योग मानकांनुसार विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करून कुशल मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यासाठी कटिबद्ध आहोत.ङ

या परिसर मुलाखतीमध्ये बावीस विद्यार्थी निवडले गेले, यामध्ये चौदा अभियांत्रिकी विद्यार्थी आणि आठ एमबीएच्या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष इंजि. बसवराज मंगरुळे, विश्वस्त ऐश्वर्या मंगरुळे, मुख्य कार्यकारी अधिकारी कर्नल जॉय डॅनियल, प्राचार्य डॉ. बी. एम. पाटील, अकॅडेमिक डीन डॉ. पी. एम. अर्धापुरकर, एमबीए महाविद्यालय संचालक डॉ. ज्योती मुंडे यांनी निवड झालेल्या यशस्वी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयातील विभागप्रमुख आणि प्राध्यापक वृंद ह्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करत अभिनंदन केले.

## श्रद्धाने देवगिरी महाविद्यालयाचा नावलौकिक उंचावला - आ.सतीश चव्हाण

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

केंद्रीय लोकसेवा आयोगाची आय.ई.एस. (इंडियन इकोनोमिक्स सर्व्हिस) परीक्षा देवगिरी महाविद्यालयाची विद्यार्थिनी श्रद्धा दिलीप नरवडे ही उत्तीर्ण झाल्याबद्दल मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे सरचिटणीस मा.आ. सतीश चव्हाण यांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ व पन्नास हजार रुपयाच्या मदतनिधीचा धनादेश देऊन विशेष सत्कार करण्यात आला. याप्रसंगी आ. सतीश चव्हाण म्हणाले की, श्रद्धाने देवगिरी महाविद्यालयाचा नावलौकिक उंचावला असून तिच्याकडून विद्यार्थ्यांनी अभ्यासासाठी प्रेरणा व स्फफ्रूर्ती घेतली पाहिजे. विद्यार्थ्यांनो स्वतःचा निर्णय स्वतः घ्या. आपण ज्या परीक्षेत यशस्वी होऊ शकतो, असे तुम्हाला वाटते त्या परीक्षेसाठी कठोर मेहनत करा. स्पर्धा परीक्षेत सातत्यपूर्ण अभ्यास व कष्टानेच यश मिळते. श्रद्धा नरवडे हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. असे गौरवउद्गार त्यांनी काढले. महाविद्यालयाने लोकसेवा आयोगाच्या विविध स्पर्धा देऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शनाची सोय केली आहे त्याचा लाभ घ्या असे आवाहन त्यांनी केले.

सत्काराला उत्तर देताना श्रद्धा नरवडे म्हणाली की या महाविद्यालयात माझे अकरावी ते पदवीपर्यंतचे शिक्षण झाले. या महाविद्यालयाचा माझ्या या यशामध्ये अनन्यसाधारण वाटा आहे. महाविद्यालयातून मला नियमित मार्गदर्शन मिळाले. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या विविध प्रकारच्या चौदा परीक्षा घेतल्या जातात. यावर लक्ष देऊन विद्यार्थ्यांनी आपल्या नियमित अभ्यासाबरोबर स्पर्धा परीक्षेचा अभ्यास योग्यवेळी सुरु केल्यास यशस्वी होणे शक्य आहे. आपण स्वत:ला तपासून स्वत:च्या पात्रतेप्रमाणे स्पर्धा परीक्षांची तयारी सुरु केली पाहिजे. त्यासह या परीक्षांचा अभ्यास करताना अभ्यासपूरक उपक्रमांमध्ये देखील सहभाग घेतला पाहिजे. त्यातून आपले व्यक्तिमत्त्व विकसित होते व त्याचा उपयोग लोकसेवा आयोगाच्या मुलाखतीमध्ये होतो. नियोजनपूर्वक परीक्षांची तयारी केली तर अपयश पदरी येत नाही. आपल्याकडे गुणवत्तेची कमी नाही मात्र आपल्याकडे माहितीचा अभाव असतो. ती दूर करण्यासाठी इंटरनेट व पूरक साधनसामुग्री वापरली तर अशा परीक्षांची तयारी करणे सोपी जाते. माझ्या यशामध्ये आई-वडिलांचे अमूल्य योगदान आहे. त्यासह महाविद्यालयाचे देखील महत्वाचे योगदान असल्याचे सांगितले.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. अशोक तेजनकर यांनी केले. ते म्हणाले की महाविद्यालयात स्पर्धा परीक्षेच्या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र स्पर्धापरीक्षा मार्गदर्शन केंद्र व अभ्यासिका सुरु केले आहे. तसेच विद्यार्थ्यांना मुबलक संदर्भ ग्रंथ उपलब्ध करून दिले आहेत. विद्यार्थ्यांनी या स्पर्धा परीक्षाकेंद्रांचा लाभ घेऊन विविध परीक्षांची तयारी करावी व श्रद्धा नरवडे हिच्यासारखे दैदिप्यमान यश प्राप्त करावे. ग्रामीण भागातून येऊन श्रद्धाने आज जे यश प्राप्त केले आहे त्याचा आम्हाला अभिमान आहे. आज महाविद्यालयातील असंख्य विद्यार्थी विविध क्षेत्रामध्ये यश मिळवत आहे तीच यशाची परंपरा श्रद्धाने कायम राखली याचा आनंद आहे. या कार्यक्रमासाठी श्रद्धाचे आईवडील दिलीप नरवडे, लक्ष्मी नरवडे, उपप्राचार्य डॉ. रवी पाटील, डॉ. अपर्णा तावरे, डॉ. विष्णू पाटील हेही उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार डॉ. मथुरा मेवाड यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा. ज्ञानेश्वर जिगे, प्रा.उमेश नवल, प्रा.वाघ यांनी परिश्रम घेतले.

## कवितेच्या लाटांवर....

### भविष्य कवितेचे

काही कवी असेही असती
आजच्या या दुनियेत
गद्य, पद्यातला फ़रक
नाही त्यांच्या ध्यानी येत

काव्य म्हणजे काय याचा
नसतो त्यांना गंध
गद्य असुनी लिखाण,
त्याला म्हणती मुक्तछंद

ह्रस्व, दीर्घ याचे त्यांना
नसते सोयरसुतक
'न' आणि 'ण' मधला
कळत नाही फ़रक

जे काही ते लिहिती त्याला
'कविता' असे म्हणती
भले नावे ठेवोत कोणी
घोडे आपलेच दामटती

'कवीला सारे असते माफ़'
हे वाक्य लाडके त्यांचे
अशांच्याच का हाती आता
भविष्य हो कवितेचे?

**– उद्धव भयवाळ**
मोबाईल: ८८८८९२५४८८

### आरोग्यदायी कारलं

कारलं खुपच बाई द्वाड
आरोग्यदायी वाटते हं खुप छान
किती गुणाच हे कारलं
गोड, आंबट, तीखट, मीठ
मसाल्याने मी याला भरलं
अलगद प्रेमाने ताटात वाढलं
जिभेला नकोसा वाटणारा
कडवटपणा गुळ, चिंचेन
स्वतःत सामावून घेतलं
कारलं म्हणे मला माझ्या
गुणांनी मी तर सुटलो
गुळ आणि चिंचेच
भांडण मात्र जुंपलं
शुगर वाल्यांनी मला माझ्या
कडवट वाटणाऱ्या रसाला
अव्वल स्थानावर ठेवलं
गुणकारी आहे मी हे
सर्वांना पटलं
नकोऔषध, गोळ्या,
हे च आपले बरे
सर्वांच्या खिशाला
परवडणारे खरे
कट्ट्यावर बसून मैत्रीणीशी
गप्पा करत होते हसून
कारलं ही मेलं द्वाड बाई
वेलीवर झोपाळा घेत घेत
हसत होते मला बघून..

**–सौ.भाग्यश्री दायमा.**

पान १ वरून

## 'सीसीएमपी' उत्तीर्ण होमिओपॅथी व्यावसायिकांस ॲलोपॅथी व्यवसाय करण्यास परवानगी

नोंदणीकृत डॉक्टरांना ॲलोपॅथी औषधांची विक्री करू शकतात. तसेच, किरकोळ औषध विक्रेते हे डॉक्टरांद्वारे देण्यात आलेले प्रिस्क्रीप्शनवर औषध विक्री करू शकतात.

तथापि महाराष्ट्र समचिकित्सा वैद्यक व्यवसायिक यांच्या प्रिस्क्रीप्शनवर औषधांची विक्री करण्यापूर्वी रजिस्ट्रेशन क्रमांक व सर्टिफिकेट कोर्स इन मॉडर्न फ़ार्माकॉलॉजी (सीसीएमपी) ही अर्हता प्राप्त केल्याबाबतचा सर्टिफिकेट क्रमांक नमूद असल्याबाबत खात्री करूनच औषधांची विक्री करावी. ही जबाबदारी किरकोळ औषध विक्रेते यांची राहील. असेही आयुक्त अन्न व औषध प्रशासन श्री. नार्वेकर यांनी कळविले आहे.

## जायंटस ग्रुप ऑफ चिकलठाणा च्या रक्तदान शिबीराला उत्स्फुर्त प्रतिसाद १४२ रक्तदात्यांनी केले रक्तदान



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

स्व.इंदरचंदजी सज्जनराजजी मुथा यांच्या स्मरणार्थ जायंटस ग्रुप ऑफ़ चिकलठाणा यांच्या संयुक्त विदयमाने दिनांक २२ डिसेंबर रोजी बी.एम. जी.फ़िज़ीकल एज्युकेशन येथे रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. स्व.इंदरचंदजी मुथा यांच्या ६ व्या पुण्यतिथी निमीत्त हे रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. सर्व प्रथम या शिबीराचे सुत्रसंचालन जायंटस ग्रुप चिकलठाणा चे अध्यक्ष राहुल मुथा यांनी केले. या महारक्तदान शिबीरात १४२ रक्तदात्यांनी रक्त संकलन केले. यामध्ये दत्ताजी भाले या ब्लड बॅंकेचे विशेष सहकार्य मिळाले. यावेळी गरजे व कुलकर्णी सर यांनी रक्तदान शिबीराबददल सांगीतले की, रक्तदान हे आजच्या युगात सर्वात श्रेष्ठ दान समजले जाते. एखादया व्यक्तीने केलेल्या रक्तदानाचे तीन लोकांना जीवदान मिळण्यास मदत होत असते. ते पुढे म्हणाले की, आज अनेक हॉस्पीटल मध्ये रक्ताची गरज भासते व बहुतांश प्रसंगी त्याची कमतरता असते. जायंटस ग्रुप ऑफ़ चिकलठाणा व मुथा परिवाराने रक्तदान शिबीर आयोजीत केले आहे ते प्रशंसनीय आहे.

संपुर्ण कार्यकम यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष राहुल मुथा, तिलोक बाठीया, मयुर जैन, प्राजेक्ट चेअरमेन अनिता मुथा व संगीता बाठीया यांनी परिश्रम घेतले. कार्यकमाचे आभार प्रदर्शन तिलोक बाठीया यांनी केले.

## संत शिरोमणी संताजी जगनाडे महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त कीर्तन सोहळा संपन्न



छत्रपती संभाजीनगर : श्री विठ्ठल रुख्माई मंदिर एन-६, एफ़-सेक्टर, संभाजी कॉलनी संभाजीनगर येथे दि.२६/१२/२०२४ रोजी श्री संत संताजी जगनाडे महाराज पुण्यतिथी व सफ़ला एकादशी निमित्त कीर्तनकार ह.भ.प. श्री.प्रदिप महाराज सांयरकर यांचे हरिकिर्तन संपन्न झाले.

सकाळी काकडा आरती भजन होऊन कृष्णा ठोंबरे व सौ. शांता ठोंबरे यांच्या हस्ते महापुजा आरती पार पडली सायंकाळी ५ ते ६ हरिपाठाचा भाविक-भक्तांनी लाभ घेतला. सदरील कार्यक्रमाचे आयोजन श्री विठ्ठल रुख्माई मंदिर समिती तफ़र्फ़े करण्यात आले आणि नियोजन अर्जुन ठोंबरे यांनी केले.

## ऑनलाइन जुगारासाठी १.९२ कोटींचे सोने लंपास; बाफना ज्वेलर्सचा असिस्टंट सेल्स मॅनेजर अटकेत

छत्रपती संभाजीनगर : आरसी बाफना ज्वेलर्समध्ये काम करणाऱ्या असिस्टंट सेल्स मॅनेजरने ऑनलाइन जुगारासाठी तब्बल १ कोटी ९२ लाख रुपयांचे सोने लंपास केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. संदीप प्रकाश कुलथे (वय ३०, रा. भानुदासनगर) असे या आरोपीचे नाव असून, पोलिसांनी त्याला बुधवारी रात्री अटक केली. संदीप कुलथे मूळ कारागीर असून, तो गेल्या दीड वर्षांपासून बाफना ज्वेलर्समध्ये काम करत होता. रिद्धी-सिद्धी नावाच्या काउंटरची जबाबदारी त्याच्यावर होती. ग्राहकांशी व्यवहार, स्टॉक व्यवस्थापन व विक्री यासाठी त्याचा महत्त्वाचा सहभाग होता.

**चोरी कशी उघड झाली?**

२४ ऑक्टोबर ते २४ डिसेंबर या दोन महिन्यांत संदीपने थोड्या-थोड्या प्रम ाणात सोने गायब केले. या काळात २२ आणि २४ कॅरेट सोन्याच्या चेन, ब्रासलेट, कडे व इतर दागिन्यांचा समावेश असलेला सुमारे १ कोटी ९२ लाख ९० हजार रुपयांचा ऐवज त्याने लंपास केला.

सहकाऱ्यांना त्याच्या हालचाली संशयास्पद वाटल्यानंतर स्टॉकची तपासणी केली असता चोरी उघड झाली. सीसीटीव्ही फुटेज तपासल्यानंतर संदीपची प्रत्यक्ष गुन्ह्यातील संलग्नता सिद्ध झाली.

पोलिस तपासात उघड झाले की, संदीपला ऑनलाइन जुगाराचे व्यसन लागले होते. त्यासाठीच त्याने दुकानातील सोन्याचा अपहार केला. या प्रकरणी दुकान व्यवस्थापनाच्या तक्रारीवरून जिनसी पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.



**श्री कृष्णा शिंदे पाटील यांच्या नवीन गृह प्रवेश वास्तुशांतीनिमित्त त्यांना सर्व सहकारी मित्रपरिवाराने प्रत्यक्ष भेट घेवून शुभेच्छा दिल्या.**

## राजधानीत 'वीर बाल दिवस' निमित्त बाबा जोरावरसिंह आणि बाबा फतेहसिंह यांच्या शौर्याला अभिवादन



**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

शिखांचे दहावे गुरु, गुरु गोबिंदसिंग यांचे सुपुत्र बाबा जोरावरसिंह आणि बाबा फतेहसिंह यांच्या अतुलनीय शौर्याला समर्पित 'वीर बाल दिवस' निमित्त या शौर्य सुपुत्रांना राजधानीत अभिवादन करण्यात आले.

कॉपर्निकस मार्गस्थित महाराष्ट्र सदनाच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमात श्रीमती नीवा जैन, निवासी आयुक्त (अ.का.) यांनी बाबा जोरावरसिंह आणि बाबा फ़तेहसिंह यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. यावेळी सहायक निवासी आयुक्त डॉ. राजेश अडपावार, स्मिता शेलार यांच्यासह महाराष्ट्र सदनातील अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित सर्वांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. महाराष्ट्र परिचय केंद्रात 'वीर बाल दिवस' निमित्त बाबा जोरावरसिंह आणि बाबा फ़तेहसिंह यांच्या शौर्याला अभिवादन. वीर बाल दिवस निमित्त बाबा जोरावरसिंह आणि बाबा फ़तेहसिंह यांच्या अतुलनीय शौर्याला महाराष्ट्र परिचय केंद्रात अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी महाराष्ट्र परिचय केंद्राच्या प्रभारी उपसंचालक (माहिती) अमरज्योत कौर अरोरा यांनी बाबा जोरावरसिंह आणि बाबा फतेहसिंह यांच्या प्रतिमांना पुष्प अर्पण करून अभिवादन केले. उपस्थित कर्मचाऱ्यांनीही वीर बालकांच्या प्रतिमांना पुष्प अर्पण करून त्यांच्या त्याग व शौर्य यांचे स्मरण केले.

## डॉ.पंजाबराव देशमुख यांना जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन



**छत्रपती संभाजीनगर**

देशाचे प्रथम कृषी मंत्री व थोर समाजसुधारक डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त आज जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांना अभिवाद करण्यात आले. निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर व उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) संगीता राठोड यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करुन अभिवादन करण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

## डॉ.पंजाबराव देशमुख यांना महावितरणमध्ये अभिवादन



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

भारताचे पहिले कृषिमंत्री डॉ.पंजाबराव देशमुख यांची जयंती महावितरणच्या प्रादेशिक व परिमंडल कार्यालयात शुक्रवारी (२७ डिसेंबर) साजरी करण्यात आली. सहव्यवस्थापकीय संचालक राहुल गुप्ता व मुख्य अभियंता पवनकुमार कछोट यांच्या हस्ते डॉ.देशमुख यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.

यावेळी अधीक्षक अभियंता शुभांगी कटकधोंड, महेश पवार, प्रभारी उपम हाव्यवस्थापक चंद्रकांत खाडे, प्रभारी सहायक महाव्यवस्थापक स्वाती चव्हाण-गाडेकर, वरिष्ठ व्यवस्थापक लक्ष्मीकांत राजेल्ली यांच्यासह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.


हे वृत्तपत्र मालक, मुद्रक , प्रकाशक - श्री. **रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५ ए , सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर , सिडको, औरंगाबाद (महा.) - ४ ३ १ ० ० ५ येथे छापून शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७, सिडको पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद (महा.)- ४ ३ १ ० ० ३ येथे प्रसिध्द केले.

• **संपादक : रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**

This Daily Printed, Published and Owned by **RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** Printed at Mansi Printers, Plot No. 45 A, Service Industry Sector, Aurangabad (M.S.)- 431005 and Published at Shop No. 3, Keshardeep Complex, N-7, Near Cidco Police Station, Aurangabad (M.S.)- 431003

• **Editor : RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**